# दि अण्णासाहेब सावंत को–ऑप. अर्बन बँक महाड लि;महाड

# लॉकर सुविधा धोरण

## सन २०२२–२०२३

# लॉकर सुविधा धोरण

**प्रस्तावना**

ग्राहक आपले दागदागिने अन्य मौल्यवान वस्तु घरात ठेवणे सुरक्षित वाटत नसलेमुळे लॉकर सुविधा वापरतात. लॉकर बाबत प्रत्येक बॅकेची नियमावली भिन्न आहे मात्र सर्वोच्च न्यायालयाने अमिताभ दास गुप्ता विरुध्द युनायटेड बॅक ऑफ इंडिया केस नं.३९६६/२०१०मध्ये दि.१९ फेब्रुवारी २०२१ रोजी दिलेले निर्णयानुसार रिझर्व्ह बॅकेने देशातील सर्व बॅकामधील लॉकर बाबत सुधारित नियमावली जारी केली असून त्याची अंमलबजावणी ०१ जानेवारी २०२२ पासून होणार आहे. त्यानुसार रिझर्व्ह बॅक ऑफ इंडिया परिपत्रक क्र.RBI/2021-2022/86 DoR. LEG. REC/40/09.07.005/2021-22 दि.१८ ऑगस्ट २०२१ नुसार निर्देशित केलेप्रमाणे सुधारित नियमावलीतील काही महत्वाचे मुद्दे –

१. भारतीय रिझर्व्ह बॅकेने बॅकांमधील लॉकर्ससाठी एक मार्गदर्शक नियमावली तयार केलेली असून त्या धर्तीवरच संबंधित बॅकांनी आपले लॉकर ॲग्रीमेंट तयार करायचे आहे. थोडक्यात, आता या करारातील अटी व शर्ती प्रत्येक बॅकेनुसार भिन्न असणार नाहीत.

२. सध्या लॉकर सुविधा वापरणाऱ्या ग्राहकांना ०१ जानेवारी २०२३ पर्यंत नव्या पध्दतीचे लॉकर ॲग्रीमेंट करायचे आहे तर ०१ जानेवारी २०२२ पासून लॉकर घेणाऱ्या ग्राहकास नव्या पध्दतीचे लॉकर ॲग्रीमेंट करावे लागणार आहे. बॅक आता ३ वर्षाचे लॉकर भाडे व गरज पडल्यास लॉकर ब्रेक– ओपन करण्यासाठी येणारा खर्च एवढयाच मुदत ठेवीचा आग्रह धरु शकेल.

३. लॉकर ज्या ठिकाणी ठेवले आहेत त्या जागेच्या सुरक्षिततेची योग्य व आवश्यक ती काळजी बॅकेने घ्यायची आहे. जर चोरी, दरोडा, आग लागणे अथवा बॅक कर्मचाऱ्याच्या चुकीने अथवा गैरव्यवहारामुळे लॉकरमधील चीजवस्तू गहाळ झाली तर बॅकेने त्याची

नुकसान भरपाई ग्राहकास देणे बंधनकारक राहील व अशी भरपाई लॉकरच्या वार्षिक भाडयाच्या १०० पट इतकी असेल. उदाहरणार्थ, जर वार्षिक लॉकर भाडे रु.४०००/— असेल व वरीलपैकी कोणत्याही कारणाने जर लॉकरमधील वस्तू गहाळ झाल्या तर ग्राहकास रु.४ लाख एवढी भरपाई मिळेल. ही भरपाई झालेल्या नुकसानीइतकी असेलच असे नाही.

४. जर भूकंप, चक्रीवादळ, पूर यासारख्या नैसर्गिक आपत्तीने लॉकरमधील चीजवस्तूंचे नुकसान झाल्यास बॅक नुकसान भरपाई देण्यास बांधील असणार नाही.

५. लॉकरचा वापर झाल्यावर संबंधित ग्राहकास बॅकेने रजिस्टर मोबाईल व/किंवा ई—मेल वर लॉकर ऑपरेट झाल्याचा संदेश हा तारीख व वेळ टाकून पाठविणेचा आहे.

६. लॉकरची प्रतिक्षा यादी ग्राहकास सहज उपलब्ध असली पाहिजे व ही यादी बॅकेच्या कोअर बॅकींग सिस्टीममध्ये (सीबीएस) उपलब्ध असली पाहिजे. जर लॉकर रिकामे असतील तर त्याचीही माहिती ग्राहकास देणे आता आवश्यक असणार आहे.

७. ज्या ठिकाणी लॉकर ठेवले जातात अशा स्ट्रॉग रुमची योग्य व आवश्यक ती सुरक्षा व्यवस्था ठेवणे ही बॅकेची जबाबदारी असून अनाधिकृत व्यक्ती स्ट्रॉग रुममध्ये येणार नाही. यासाठी स्ट्रॉग रुममध्ये येणाऱ्या व स्ट्रॉग रुममधून बाहेर जाणाऱ्या व्यक्तीचे सीसीटिव्ही रेकॉर्डिंग करणे आवश्यक आहे. असे किमान १८० दिवसांचे सीसीटिव्ही फुटेज जतन करुन ठेवणे बॅकेवर बंधनकारक असणार आहे. लॉकर अनाधिकृत व्यक्तीने ऑपरेट केले असल्याची तक्रार झाली असेल तर पोलिस तपास संपेपर्यंत सीसीटिव्ही फुटेज जतन करुन ठेवावे लागणार आहे.

८. लॉकरच्या किल्लीवर बॅकेचा आणि शाखेचा आयडेंटिफिकेशन कोड एम्बॉस करणे आवश्यक असणार आहे. यामुळे लॉकर व लॉकरधारक यांचा तपास करणे विविध तपास यंत्रणांना सोपे होऊ शकेल.

लॉकर सुविधा धोरणात रिझर्व्ह बॅक परिपत्रकानुसार ग्राहक यथोचित पुर्वतपासणी (Customer Due Diligence), लॉकर वितरण, स्ट्रॉगरुम सुरक्षितता, लॉकर ऑपरेशनस(ग्राहकांनी लॉकर वापरण्याची पध्दत), वारस नोंद व त्याची अंमलबजावणी, लॉकर व्यवहार बंद करणे, बॅकेची देयता, जोखीम व्यवस्थापन, पारदर्शक व्यवहार व ग्राहक मार्गदर्शन या प्रमुख मुद्दयांचा समावेश आहे.

### अ. **Customer Due Diligence** (ग्राहक यथोचित पुर्वतपासणी) :–

१. सध्याचे लॉकर धारकांनी रिझर्व्ह बॅकेचे आपला ग्राहक ओळखा चे मार्गदर्शक परिपत्रकानुसार आवश्यक पुर्तता केली आहे याची खातरजमा करण्यांत येईल व जे ग्राहक याची पुर्तता करीत नसतील त्यांनी दि.३०.०६.२०२२ पर्यंत पुर्तता करणेची आहे.

२. दि.०१ जानेवारी २०२२ पासून नवीन लॉकर मागणी बाबत ग्राहक '' आपला ग्राहक ओळखा'' या धोरणाची पुर्तता करणारे ग्राहकांनाच लॉकर वितरण करण्यांत येईल.

३. लॉकर धारकांना कोणत्याही प्रकारचे अवैध वस्तु लॉकर मध्ये ठेवता येणार नाही व अशा प्रकारची बाब निदर्शनास आलेस सदरचा ग्राहक कायदेशिर कारवाईस पात्र राहील ही अट लॉकर करारपत्रात असेल.

४. लॉकर धारकाचा अद्यावत पासपोर्ट साईज फोटो बॅकेचे दप्तरी असणे आवश्यक आहे व फोटोची योगय ती खातरजमा करुनच बॅकेचे अधिकारी लॉकर धारकाला व्यवहार करण्यास अनुमती देतील.

### ब. लॉकर वितरण :–

१. नवीन लॉकर मागणी करणारे ग्राहकांना त्यांचे सोईचे ठिकाणी लॉकर उपलब्ध करुन देण्याकरिता बॅकेचे CBS प्रणालित शिल्लक लॉकरची अद्यावत यादी राहील. अर्ज करणारे

ग्राहकांचे मागणी नुसार लॉकर उपलब्ध नसलेस बॅक अशी प्रतिक्षा यादी (Waiting List) तयार करील व प्रतिक्षा यादी नुसार नंबर टाकून अर्जाची पोहच दिली जाईल.

२. रिझर्व्ह बॅक मार्गदर्शक तत्वांचा अवलंब करुन नवीन भाडेकरार नमुना तयार करुन दि. ०१ जानेवारी २०२२पासून नवीन कराराकरिता घेण्यांत येईल व बॅकेचे सध्याचे लॉकर धारकांचे नवीन नमुन्यातील भाडेकरार नुतनीकरण ३१ डिसेंबर २०२२ पर्यंत पुर्ण करणे बंधनकारक राहील.

३. नवीन लॉकर वितरण करण्यापूर्वी लॉकर भाडे करार दोन प्रतीत करण्यांत येईल व त्यावर लॉकर धारक व ब्रॅच मॅनेजर यांचे सही शिक्यांची नोंद घेऊन मुळप्रत बॅकेत जमा राहील व दुय्यम प्रत ग्राहकाला देण्यांत येईल.

क. लॉकर भाडे –

लॉकर धारकांनी लॉकर मिळताच ॲडव्हान्स वार्षीक भाडे जमा करण्याचे आहे व लॉकर धारकांनी भाडे नियमित जमा करणे बंधनकारक आहे. त्यासाठी लॉकर धारकाचे पुढील किमान ३ वर्षाचे भाडे व बंद असलेले लॉकर ब्रेक ओपन करण्याचे झालेस त्याचे खर्चाचा विचार करुन प्रती लॉकर कमीत कमी रु.५०००/– इतकी मुदत ठेव लीन मार्क करुन घेईल.

ड. लॉकर युनीट सुरक्षितता –

१. बॅकेचे लॉकर युनिट पाऊस, पूर या पासून सुरक्षित राहील याची दक्षता घेण्यांत येईल.

२. लॉकर युनिट ठेवण्यांत आलेले स्ट्रॉगरुमचा मुख्य दरवाजा CCTV चे कक्षेत राहील याची खबरदारी घेऊन सदरचे फुटेज किमान १८० दिवस सुरक्षित ठेवण्यात येईल.

३. लॉकर ऑपरेट करणारे ग्राहकाची ओळख व संगणकीय नोंदी तसेच लॉकर धारकाचे नोंदणीकृत मोबाईलवर लॉकर ऑपरेटिंग बाबत प्रत्येक व्यवहाराचा संगणकीय

...Savant Co-op. Urban Bank Mahad Ltd., Mahad

प्रणालीतून SMS पाठविण्याची पध्दत याबाबत शाखेतील अधिकारी वर्गाला योग्य प्रशिक्षण देण्यांत येईल.

४. बॅकेकडे सध्या मॅन्युअल ऑपरेटींग लॉकर आहेत. भविष्यात इलेक्ट्रॉनिक लॉक किंवा आधुनिक यांत्रिक लॉकर सुविधा देताना Bureau of Indian Standards (BIS) चे मार्गदर्शक तत्वांचा अवलंब करण्यांत येईल.

५. लॉकर किज बॅक व शाखा कोड एम्बोस करण्यांत आलेल्या आहेत. नव्याने लॉकर युनिट खरेदी होताच प्रथमतः एम्बॉसींग बाबत योग्य खातरजमा करण्यांत येईल.

## इ. लॉकर व्यवहार **(Locker Operations)**

१. लॉकर धारकांनी स्वतःची योग्य ओळख बॅकेतील अधिकारी वर्गाला करुन देऊन लॉकर कक्षात प्रवेश करतानाची वेळ नोंद करावी व लॉकर कक्षातून बाहेर येतानाची वेळ नोंद व सही करण्याची आहे.

२. लॉकर व्यवहाराचे वेळी लॉकर धारकांचे बरोबर बॅकेचे अधिकारी लॉकर कक्षात प्रवेश करतील बॅक अधिकारी आपले किजचा वापर करुन बाहेर येतील व लॉकर व्यवहारात ग्राहकाला पुर्णपणे गोपनियता राहील याची दक्षता बॅक अधिकारी घेतील.

३. प्रत्येक लॉकर व्यवहाराची नोंद SMS व/वा e mail ने संबंधीत ग्राहकाचे नोंदणीकृत e mail व मोबाईलला पाठविण्याकरिता बॅकेचे अधिकारी योग्य दक्षता घेतील. याकरीता लॉकर धारकांची नोंदणीकृत मोबाईल नंबर व e mail देण्याची जबाबदारी राहील.

## ई. अंतर्गत सुरक्षितता :–

१. बॅकेकडे शिल्लक असलेले लॉकर व सरेंडर करण्यांत आलेले लॉकरच्या कीज बंद लिफाफ्यात राहतील व डुप्लीकेट मास्टर की मुख्यालयात सेफ कस्टडीत राहील.

२. लॉकर ऑपरेटींग रजिस्टरच्या नोंदी CBS प्रणालीत किंवा अन्य संगणकीय प्रणालीत सायबर सुरक्षितता धोरणाचा अवलंब करुन रहातील.

३. लॉकर धारकांनी व्यवहारानंतर लॉकर योग्य रितीने बंद केलेला नाही असे बॅंकेचे अधिकारी वर्गास निदर्शनास आलेस त्याची नोंद लॉकर ऑपरेटींग रजिस्टरला करुन नोंदणीकृत मोबाईलवर SMS व नोंदणीकृत ईमेलवर कळविण्यांत येईल.

उ. वारस नोंद सुविधा व वारसांचा अधिकार :–

१. लॉकर धारकांना वारस नोंद (Nomination) सुविधा देण्यांत येईल. याकरिता वारसाची KYC व लेटेस्ट फोटोग्राफ ग्राहकांनी अटेस्टेड करुन देणे आवश्यक राहील तसेच विहीत नमुन्यातील फॉर्मस SLI, SL/A, SL2, SL3, SL3/A वारस नोंदी करिता सांक्षाकित करुन देणारे ग्राहकांनी स्वत:चे सहीने देणे याकरिता साक्षीदार आवश्यक नाही. मात्र सही ऐवजी अंगठा देणारे ग्राहकांनी दोन साक्षीदारांचे सहीने फॉर्म सादर करण्याचे आहेत.

२. वारस नोंदीची संगणक प्रणालीत योग्य नोंद राहील.

३. ग्राहकांनी नोंदविलेले वारस, केलेले बदल व रद्द केलेले वारस नोंदी बाबत पोहच acknowledgment देण्याची आहे.

ऊ. मयत लॉकर धारकाचे क्लेम :–

१. लॉकर धारकांनी विहीत नमुन्यातील फॉर्मस सादर करुन वारस नोंदणी केली असलेस सदर वारसाची लेटेस्ट KYC फोटोसह दप्तरी घेण्यात यावी व इंडमिनिटी बॉण्ड दप्तरी घेऊन वारसांचे नावे लॉकर नोंदण्यात यावे. लॉकर धारकांनी वारस नोंदणी केली नसलेस कायदेशीर वारस दाखला मागणी घेऊन ज्यां वारसाने मयत लॉकर धारकाचे लॉकर बाबत हक्क मागणी केली असेल अशा व्यक्तीचे नावे लॉकर करण्यापूर्वी अन्य

वारसांना नोटीस वजा पत्रव्यवहार करण्यांत यावा तसेच अर्जदाराकडून लेटेस्ट KYC फोटोसह घेणे व इंडमिनिटी बॉण्डची पुर्तता करणे.

२. लॉकर धारकाचे वारसांकडे लॉकर कि असलेबाबत खातरजमा करावी अन्यथा लॉकर ब्रेक ओपन बाबत असणारे तरतुदी प्रमाणे लॉकर ब्रेक ओपन करुन संबंधित वारसांना नवीन लॉकर कि देण्याची आहे.

३. मयत वारसाचे लॉकर बाबत आलेले क्लेम बाबत पुर्तता करणेस १५ दिवस इतका अधिकतम कालावधी राहील.

४. शाखेकडे आलेले क्लेम त्याची केलेली पुर्तता किंवा काही कायदेशीर बाबी असलेस त्या सर्व नमूद करुन दरमहाचा अहवाल मुख्यालयाकडे पाठविण्याचा आहे व मुख्यालयाचे प्रशासन विभागाने संचालक मंडळास सादर करणेचा आहे.

५. दोन किंवा अधिक व्यक्तिनी संयुक्त रित्या लॉकर धारण केलेले असेल व 'संयुक्त सहीने ' असे व्यवहार अधिकार असतील व त्यापैकी एक व्यक्ती मयत आहे अशा वेळी मयताचे अधिकृत वारसासंबंधी क्लेम पुर्तता होत नाही तोपर्यंत असे लॉकर ऑपरेट करता येणार नाही.

६. लॉकर धारकाचा वारस खालील बाबींची पुर्तता करीत असेल तरच मयत व्यक्तीचे लॉकर मधील वस्तुंबाबत व्यवहार होईल.

१. वारसाबाबत अधिकृत कागदोपत्री पुरावा सादर करणे.

२. कोणत्याही कोर्ट/ मंच ने लॉकर व्यवहारासंबंधी काही आदेश सुचना दिलेल्या नाहीत याची खातरजमा होणे आवश्यक.

३. संयुक्त लॉकर धारकाचे बाबत कायदेशीर अधिकारांची पुर्तता आवश्यक.

The ...saheb Savant Co-op. Urban Bank Mahad Ltd., Mahad

**ए. लॉकर धारकाचा वारस अज्ञान असेल तर :—**

१. लॉकर धारकाचा वारस अज्ञान असेल अशा वेळी सदर अज्ञानाचे कायदेशीर पालकांची आवश्यक कायदेशीर बाबींची पुर्तता व इंडीमनेटी बॉण्डची पुर्तता केल्यानंतर लॉकर व्यवहारावेळी दोन साक्षीदारांची उपस्थिती आवश्यक राहील त्यापैकी एक बॅकेचा अधिकारी (लॉकर व्यवहाराचे काम पहाणारे अधिकारी व्यक्ती) व अज्ञानाचा कायदेशीर पालक असेल.

२. अज्ञानाचे बाबतीत मयत व्यक्तीचे लॉकर मधील स्विकारलेले वस्तुं यादी बाबत व लॉकर रिकामे केले असलेबाबत अज्ञानाचे कायदेशीर पालकांचे स्वतंत्र स्टेटमेंट बॅक घेऊ शकेल.

**ऐ. लॉकर बंद करणे/ ब्रेक ओपन करणे :—**

१. खालील परिस्थितीत बॅक लॉकर बंद करील किंवा ब्रेक ओपन करण्यांत येईल.

अ. लॉकर धारकाची चावी हरविली असलेस लॉकर धारकाचे खर्चाने आवश्यक पुर्तता करुन.

ब. कोर्ट ऑर्डर किंवा शासकीय अंमलबजावणी संस्था (Govt. enforecement agencies) यांचे आदेशानी लॉकर जप्त केले असलेस.

क. लॉकर धारक नियमांचे पालन करीत नसलेचे सिध्द झालेस.

२. लॉकर धारकाची चावी हरविली असलेबाबत त्यांनी बॅकेकडे लेखी स्वरुपात दिलेला अर्ज व आवश्यक फी भरणा केलेनंतर बॅक लॉकर टेक्निशिअनचे मदतीने लॉकर ब्रेक ओपन करील मात्र यावेळी लॉकर धारक व बॅकेचे प्रतिनिधीची उपस्थिती लॉकर कक्षात राहील. तसेच प्रक्रिया पुर्ण झालेची नोंद करुन त्यावर लॉकर धारक व बॅक अधिकारी साक्षांकन करतील.

३. कोर्ट वा शासकीय अंमलबजावणी संस्थांचे आदेशानुसार ब्रेक ओपन करण्याची प्रक्रिया असलेस बॅक अधिकारी त्यास योग्य सहकार्य करतील.

४. कोर्ट वा शासकीय आदेशाचे अंमलबजरवणीने लॉकर ब्रेक ओपन करण्याचे कारवाईचे वेळी लॉकर धारकांनी उपस्थित राहणेबाबत बॅकेकडे उपलब्ध असलेले पत्यावर पत्र, रजिस्टर मोबाईलला SMS वा रजिस्टर ई मेल वर मेल करुन योग्य सुचना देण्यांत येतील.

५. अंमलबजावणी अधिकारी यांचेकडे जप्त लॉकरमधील वस्तु सोपविताना त्याची यादी दोन स्वंतत्र साक्षीदार, बॅक अधिकारी व अंमलबजावणी अधिकारी यांचे सही शिक्याचे नोंदीने करण्यांत येईल व सदरच्या वस्तु अंमलबजावणी अधिकारी यांना सुपुर्त केले बाबत लॉकर धारक उपस्थित असलेस त्याना एक प्रत देण्यात येईल व पोहच घेतली जाईल. लॉकर धारक उपस्थित नसलेस बॅकेकडे असलेले पत्यावर त्याची प्रत रजिस्टर पोस्ट / स्पीड पोस्टने पाठविण्यांत येईल.

६. ज्या ज्या ठिकाणी आवश्यक असेल त्या ठिकाणी बॅक ब्रेक ओपन व्यवहाराचे व्हीडीओ शुटींग करुन भविष्यातील पुराव्याकरिता जतन करुन ठेवील.

**ओ. लॉकर धारकांनी लॉकर भाडे न भरलेस करावयाची कारवाई :—**

१. लॉकर धारकांनी तीन वर्ष वा अधिक कालावधीचे लॉकर भाडे सुचना / नोटीस देऊनही भरणा केले नसलेस अशी कारवाई करण्यांत येईल.

२. लॉकर ब्रेक ओपन बाबत कारवाईची नोटीस बॅकेकडे उपलब्ध असलेले पत्यावर SMS , e mail ने पाठविण्यांत येईल नोटीस देऊनही कारवाई वेळी लॉकर धारक उपस्थित नसलेस कायदेशीर अंमलबजावणी वेळी घ्यावयाचे दक्षतेप्रमाणेच सर्व बाबींची पुर्तता करण्यांत येईल.

३. ब्रेक ओपन केलेले लॉकर मध्ये असणारे चीज वस्तुं यादीसह सदरच्या वस्तु बॅकेचे सेफ कस्टडीत ठेवण्यांत येतील. भविष्यात लॉकर धारकांनी मागणी केल्यास त्या त्यांना परत करण्याच्या आहेत व अशा व्यवहारांची योग्य नोंद शाखेचे दप्तरी राहील.

**औ. दिर्घकाळ अन ऑपरेटिव्ह लॉकर बाबत करावयाची कारवाई :—**

१. लॉकर धारकांनी आपले लॉकर सात वर्षे अन ऑपरेटिव्ह ठेवले असलेस असे लॉकर ऑपरेट करण्याबाबत सुचना /नोटीस देऊनही दखल न घेतल्यास असे लॉकर ब्रेक ओपन करण्याची कारवाई करण्यांत येईल.

२. लॉकर धारक जरी लॉकर भाडे नियमित भरणा करीत असेल तरी अन ऑपरेटिव्ह लॉकर कारवाईस पात्र राहील.

३. अन ऑपरेटीव्ह लॉकर ब्रेक ओपन करताना यापूर्वी तपशिलवार नमूद केले प्रमाणे ब्रेक ओपन बाबतचे प्रक्रियांचा अवलंब करण्याचा आहे व याबाबतची अट लॉकर करारात नमूद करण्यांत येईल.

**अं. लॉकर धारकास नुकसान भरपाई व बॅकेचे उत्तरदायित्व :—**

१. लॉकर युनिट बाबत बॅक आवश्यक काळजी घेईल मात्र भुकंप, चक्रीवादळ, पुर अशा नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेस तसेच लॉकर धारकाचे निष्काळजी वा बेजबाबदारीमुळे लॉकरचे नुकसान झालेस बॅकेची कोणतीही जबाबदारी असणार नाही.

२. चोरी, दरोडा अथवा कोणत्याही प्रकारचा फ्रॉड या कारणास्तव लॉकर धारकाचे नुकसान झालेस प्रथमतः या घटनांची नोंद बॅक रिझर्व्ह बॅक ऑफ इंडीया यांचेकडे करील.

३. लॉकर धारकाचे नुकसानीस बॅक जबाबदार आहे असा निष्कर्ष झालेस अशी नुकसान भरपाई दयावी लागेल व ही नुकसान भरपाई जास्तीत जास्त ज्या वर्षी नुकसान झाले त्यावेळी असलेले वार्षीक भाडयाचे १०० पट इतकी राहील.

**जबाबदारी व्यवस्थापन, पारदर्शकता व ग्राहक मार्गदर्शन :—**

१. नैसर्गिक आपत्ती व चोरी, दरोडा, फ्रॉड यांचे बाबत उपलब्ध विमा संरक्षण लॉकर धारकांना देण्याकामी प्राधान्याने प्रयत्न करण्यांत येईल.

२. लॉकर करारात आवश्यक पारदर्शकता ठेऊन लॉकर धारक व बॅकेचे जबाबदारी बाबत तपशिलवार नमूद करावे.

३. ग्राहकांचे मार्गदर्शनाकरिता लॉकर धोरण लॉकर कराराचा नमुना व अटी शर्थी शाखा कार्यालयात व वेबसाईटला उपलब्ध करुन देण्याबाबत योग्य अंमलबजावणी एप्रिल २०२२ पर्यंत करण्यांत येईल.

४. पूर्वीचे लॉकर धारकांचे करार नुतनीकरण करण्यांत येतील व धोरणानुसार त्याची दुय्यम प्रत लॉकर धारकांना देण्यांत येईल.

**सदर लॉकर धोरणात रिझर्व बॅकेकडून वेळोवेळी प्राप्त झालेल्या सुचनांप्रमाणे बदल केला जाईल.**

**संचालक मंडळ सभा ता.१०/१२/२०२१ रोजीचे सभेमध्ये ठराव क्र.३३ ने या धोरणास मान्यता देणेत येत आहे.**

The Annasaheb Savant Co-op. Urban Bank Mahad Ltd., Mahad

(यशवंत ओजाळे)
मॅनेजिंग डायरेक्टर

(श्रीमती.शोभा सुधाकर सावंत)
अध्यक्षा

# THE ANNASAHEB SAVANT CO-OP URBAN BANK MAHAD

## AVAILABLE LOCKER INFORMATION AS ON 31.05.2025

| SR NO | BRANCH NAME | AVAILABLE LOCKER |
|---|---|---|
| 1 | MAHAD | 42 |
| 2 | SHIRIWARDHAN | 31 |
| 3 | MURUD | 35 |
| 4 | POLADPUR | 22 |
| 5 | MHASALA | 41 |
| 6 | BIRWADI | 50 |
| 7 | PALI | 5 |
| 8 | PANVEL | 120 |
| 9 | MOHOPADA | 52 |
| 10 | KHOPOLI | 16 |
| 11 | MANGAON | 58 |
| 12 | NERAL | 43 |
| 13 | PEN | 26 |
| 14 | ALIBAG | 67 |
| 15 | URAN | 51 |
| 16 | ROHA | 34 |
| 17 | KARJAT | 0 |
| 18 | TUDIL | 44 |
| 19 | NIJAMPUR | 7 |
| 20 | BORLIPANCHTAN | 60 |
| 21 | MANDANGAD | 33 |
| 22 | PIRANGUT | 37 |
| 23 | TALA | 43 |
| 24 | NAVENAGAR | 1 |
| | **TOTAL** | **918** |

(Sandeep M. Shelar)
Deputy Gen. Manager